F/c

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६१७९६९
E-mail : desk१८@dtemaharashtra.gov.in Internet : www.dtemaharashtra.gov.in

**ई-मेल/ रजिस्टर एडी/ स्पीड पोस्टद्वारे**

क्रमांक : १८/तशिसं/ईबीसी/डीबीटी/२०१९/ २०४
दिनांक : ०२/०३/२०१९

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर.

**विषय : डी.बी.टी. पोर्टलवर विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी व अर्जांची तपासणी करण्याकरीता देण्यात आलेल्या अंतिम मुदतीबाबत.**

संदर्भ : १) या संचालनालयाचे पत्र क्र.: १८/तशिसं/ईबीसी/डीबीटी/२०१९/८७, दि. २०/०२/२०१९
२) दि. २८.०२.२०१९ रोजी पार पडलेल्या बैठकीचे इतिवृत्त.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, संदर्भ क्र. २ अन्वये दि. २८.०२.२०१९ रोजीच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनाल, मंत्रालय यांनी आयोजित केलेल्या बैठकीतील निर्णयानुसार व त्या अनुषंगाने प्राप्त बैठकीच्या इतिवृत्तानुसार राज्यातील विविध विभागांना शिष्यवृत्ती योजनांसाठी विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरण्याची व विभागांनी सदर अर्जाची तपासणी (मंजूर/नामंजूर) करण्याची अंतिम मुदत निश्चित करण्यात आलेली असून, तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांकरीता **विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी अंतिम दि. ०१.०३.२०१९ व अर्जांची तपासणी (मंजूर/नामंजूर) करण्यासाठी अंतिम दि. १५.०३.२०१९** अशी निश्चित केलेली आहे.

याबाबत आपणास कळविण्यात येते की, विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी अंतिम तारीख ०१.०३.२०१९ अशी असून प्राप्त अर्जांची तपासणी (मंजूर/ नामंजूर) करण्याची अंतिम तारीख १५.०३.२०१९ ही निश्चित केल्याने आपण आपल्या अखत्यारितील संस्थांना दि. ११.०३.२०१९ पर्यंत अर्जांची तपासणी करून घेण्याबाबत कळवावे व विभागीय कार्यालय स्तरावरील अर्जांची तपासणी दि. १३.०३.२०१९ पर्यंत करुन घ्यावी. प्राप्त अर्जांच्या तपासणीच्या अंतिम दिनांकानंतर कोणत्याही स्तरावर पेंडिंग राहिलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत व असे अर्ज अंतिम दिनांकानंतर आपोआपच सिस्टिममधून रद्द होतील.

पात्र विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये या कारणास्तव संस्था स्तरावर, विभागीय स्तरावर तपासणीसाठी प्रलंबित असलेले अर्ज अंतिम दिनांकापूर्वी निकाली (मंजूर/ नामंजूर) काढावेत. तसेच विद्यार्थ्यांचे Sent Back करण्यात आलेले अर्ज अगर विद्यार्थी / क्लार्क / प्राचार्य / विभागीय कार्यालय यांच्या लॉगीनमध्ये त्यावरील पुढील कार्यवाहीसाठी प्रलंबित असतील तर अशा अर्जाबाबतची प्रलंबित कार्यवाहीसुध्दा अंतिम दिनांकापूर्वी पूर्ण करुन निकाली काढावेत. प्रलंबित अर्जाबाबतची कार्यवाही विहित मुदतीत पूर्ण न केल्यास रदद झालेल्या अर्जांची सर्वस्वी जबाबदारी संस्था प्रमुखाची राहिल. त्याबाबतच्या सूचना संबंधित संस्थांना द्याव्यात तसेच संस्थांनी त्या त्या संस्थांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनाही सूचित करण्याबाबत कळवावे.

(डॉ. अभय वाघ)
संचालक
तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा. मुंबई.

पृष्ठ क्र. तंशिसं/विकाना/ईबीसी/नि. भत्ता/2019/ 867
दिनांक :- 6 MAR 2019

प्रति,
प्राचार्य/संचालक,
सर्व शासकीय तंत्रनिकेतन, अनुदानित व खाजगी विना अनुदानित व कायम विनाअनुदानित पदवी/पदव्युत्तर पदवी व पदविका संस्था, नागपूर विभाग,
नागपूर.

शैक्षणिक वर्ष 2018-19 करिता सदरहू पत्रात नमुद केल्यांप्रमाणे आपल्या संस्थेकडून विद्यार्थ्यांचे ऑनलाईन अर्जांची तपासणी (मंजूर/नामंजूर) करण्यांसाठी **दि.**11/03/2019 पर्यंत अंतिम तारीख निश्चित केलेली आहे. करिता संस्थास्तरावर प्रलंबित असलेले अर्ज या अंतिम दिनांकापूर्वी निकाली काढावे.

(गुलाबराव ठाकरे)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय,
नागपूर.